॥ ॐ ॥

# 'स्व'-रूपवर्धिनी कार्यवृत्त

सप्टेंबर २०२२

२२/१, मंगळवार पेठ, पारगे चौक, पुणे – ४११ ०११.

(कार्यालय दूरध्वनी) : २६१२१७०४ भ्रमणध्वनी : ९०११३८६३८६

Email : wardhinee@gmail.com

Website : http://www.swaroopwardhinee.org

## गणेशोत्सव काळात समाजाने घेतलेली कामाची दखल

आय विटनेस

### मिरवणुकीत मल्लखांबाचे सादरीकरण...



### गणेशोत्सवात पथनाट्यातून जनजागर

पुणे : पुढारी वृत्तसेवा

'ऐका हो ऐका...' असा आवाज गणेशोत्सवाच्या गर्दीत कानी पडत आहे... कारण काही कलाकार गर्दीत पथनाट्य सादर करून सामाजिक विषयांवर जनजागृती करत आहेत. कोणी 'वाहतूक नियमांचे पालन करा' हे पथनाट्यातून सांगण्याचा प्रयत्न करीत आहेत तर कोणी स्वच्छतेवर पथनाट्यातून दृष्टिक्षेप टाकण्याचा प्रयत्न करीत आहेत.

कलाकारांच्या या प्रयत्नाला लोकांचीही दाद मिळत असून, पथनाट्य पाहण्यासाठी कलाकारांच्या अवती-भवती मोठी गर्दी होत आहे. दोन वर्षांनंतर उत्सवात विविध कलापथके आणि संस्थांकडून ठिकठिकाणी पथनाट्ये सादर केली जात आहेत. त्यात शालेय विद्यार्थ्यांपासून ते तरुण, ज्येष्ठ कलाकारांचा समावेश आहे. सर्व जण उत्कृष्टपणे पथनाट्य सादर करीत आहेत. त्यातून सामाजिक विषय लोकांसमोर मांडण्याचा अन् त्यातून जनजागर करण्याचा प्रयत्न करीत आहेत. गणेश मंडळे, सोसायट्यांमधील गणपती, शाळा-महाविद्यालये येथेही पथनाट्ये सादर होत आहेत. तरुण कलाकार आणि ज्येष्ठ कलाकारांचे यातून अर्थार्जनही होत असून, मोठ्या मेहनतीने, उत्कृष्ट सादरीकरणाने प्रत्येक जण पथनाट्यातून सामाजिक जागृती करत



स्व-रूपवर्धिनीच्या वतीने 'नदी संपावर गेली...' हे पथनाट्य सादर करताना संस्थेतील मुले-मुली.

### वस्ती भागातील मुलांचा सहभाग

गणेशोत्सवात स्व-रूपवर्धिनी संस्थेच्या शालेय व महाविद्यालयीन गटातील विद्यार्थी 'नदी संपावर गेली आहे...' हे पथनाट्य सादर करीत आहेत. विविध वस्ती भागात राहणारी ही मुले संस्थेच्या अभ्यासिका व शाखा यात रोज अभ्यासाला येतात. हीच मुले पथनाट्याचे सादरीकरण ठिकठिकाणी करत आहेत. नदी प्रदूषण, महापालिकेच्या नदी पुनरुज्जीवन प्रकल्पातील दोष, अडचणी काय हे यातून मांडले जात आहे. दहा गटांतील २५० मुले-मुली पथनाट्य सादर करीत असून, आतापर्यंत ७० ते ८० ठिकाणी पथनाट्याचे सादरीकरण झाले आहे. लोकांचा पथनाट्याला चांगला प्रतिसाद आहे, असे संस्थेचे नीलेश धायरकर, कार्यक्रम प्रमुख शुभम नरके व सांस्कृतिक विभागप्रमुख हरी धायगुडे यांनी सांगितले.

सकाळ | पुणे, गुरुवार, ८ सप्टेंबर २०२२ | ३

### 'स्व'-रूपवर्धिनी : गणित, विज्ञान, इंग्रजीबरोबरच मूल्यशिक्षणाचे धडे

## वंचितांच्या शिक्षणाचा चार दशकांचा सेवायज्ञ

सकारात्मका



'स्व'-रूपवर्धिनीच्या केंद्रात विद्यार्थ्यांची तासिका घेताना स्वयंसेवक.

'स्व'-रूपवर्धिनीची रचना : विभाग - १ : शाखा विभाग

विभाग २ : उत्थान विभाग

'स्व'-रूपवर्धिनी संस्थेच्या माहितीसाठी क्यूआर कोड स्कॅन करा



फुलांनी सजविलेला श्री गजमुखरथात विराजमान सर्वांगसुंदर गणपतीचे मुख्य मिरवणुकीत आगमन होताच, भाविकांना 'मोरयाऽऽ...मोरयाऽऽ'चा जयघोष केला. स्व-रूपवर्धिनी, गजलक्ष्मी आणि गजर ढोल-ताशा पथकांच्या सादरीकरणाने भाविकांना अचंबित केले. स्व-रूपवर्धिनीच्या विद्यार्थ्यांनी केलेल्या चित्तथरारक मल्लखांब प्रात्यक्षिकांना नागरिकांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद दिली.

- मिरवणुक सुरू (बेलबाग चौकापासून) : दुपारी ४.०१ वा.
- विसर्जन वेळ : रात्री ८ वाजून १ मिनिट (पांचाळेश्वर घाट)

# गणेशोत्सव २०२२



पुणे आणि गणेशोत्सव याचे एक आगळे-वेगळे समीकरण आपणास दिसून येते. स्वातंत्र्यपूर्व काळात लोकमान्य टिळकांनी सुरू केलेला हा उत्सव स्वातंत्र्य लढ्यासाठी राजकीय व सामाजिक प्रबोधनाची चळवळ म्हणून उभा राहिला. पण आज उत्सवात अनेक प्रकारचे बदल झाले असले तरी उद्देश मात्र तोच आहे, तो म्हणजे प्रबोधन. सध्या पुण्यात असणाऱ्या अनेक समस्यांपैकी सर्वात ज्वलंत समस्या म्हणून नदी प्रदूषणाकडे पाहिले जाते. याच समस्येवर आधारित 'नदी संपावर गेली आहे' या पथनाट्याच्या माध्यमातून प्रबोधन





करण्याचे कार्य 'स्व'-रूपवर्धिनी संस्थेच्या कार्यकर्त्यांनी केले. वर्धिनी केवळ मनोरंजनात्मक सांस्कृतिक कार्यक्रम न करता त्या माध्यमातून लोकप्रबोधन झाले पाहिजे आणि लोकांनी त्या समस्येकडे गांभीर्याने



पहावे व सकारात्मक विचार करावा हा उद्देश असतो. **'नदी संपावर गेली आहे'** या पथनाट्याच्या माध्यमातून पुण्याच्या एकेकाळी वैभव असणाऱ्या मुळा-मुठा





नद्यांची गटारे झालेली आहेत. तिची सध्याची परिस्थिती पथनाट्याच्या माध्यमातून पुणेकरांच्या समोर मांडली गेली. सध्या नद्यातील प्राणवायू कमी झाल्याने जलजीवांचे जिवंत राहणे कठीण झाले आहे. नदीत कचरा टाकून नदीचे झरे व प्रवाह बुजवणे, औद्योगिक रसायन मिश्रित कचरा व सांडपाणी, प्रक्रिया न करता नदीत सोडणे, पूर नियंत्रण रेषेत बांधकामे केली जाणे असे अनेक गैर प्रकार घडत आहेत. परिणामी पुण्याला पुराचा धोका वाढणार आहे. तसेच सध्याच्या घोषित पुनरुज्जीवन नदी योजनेतील दोष व नदी स्वच्छ करण्यासाठीचे उपाय हे सर्व मुद्दे 'नदी संपावर गेली आहे' या पथनाट्याच्या माध्यमातून लोकांसमोर



प्रभावीपणे मांडण्यात आले.

पथनाट्य बसवण्यापूर्वी काही शाखा व अभ्यासिकांनी नदीपात्राला प्रत्यक्ष भेट दिली. नदीची वास्तविक स्थिती पाहिल्यानंतर वर्धक-वर्धिकांनी गांभीर्याने आणि पोटतिडकीने विषय मांडणी केली. यामध्ये शाखा विभागाच्या पाच शाखा व उत्थान विभागाच्या पाच अभ्यासिका यांचा सहभाग होता. पुण्यातील सर्व पेठांमध्ये नामवंत गणेश मंडळांमध्ये तसेच गर्दीच्या ठिकाणी व नदीच्या आजूबाजूच्या परिसरांमध्ये जवळपास १५६ ठिकाणी पथनाट्याचे सादरीकरण झाले. ज्यात जवळपास २०५ युवक-युवती व वर्धक-वर्धिकांनी सहभाग नोंदविला. अशा प्रकारे हजारो लोकांसमोर प्रत्यक्ष सादरीकरण करण्यात आले.



### पथनाट्यास कारण की...

◆ काल १२ सप्टेंबर रोजी शिवतेजनगर अभ्यासिकेतील मुलांसोबत नदीपात्रात जाण्याचे नियोजन केले. या अभ्यासिकेने यावर्षी पहिल्यांदाच नदीसंवर्धनावर आधारित असणारे पथनाट्य सादर केले. एक आठवडाभर सराव करून गणेशोत्सवादरम्यान अनेक ठिकाणी सादरीकरण करण्यात आले. पण फक्त पथनाट्य न करता गणेशोत्सवानंतर प्रत्यक्ष नदीची काय अवस्था होते याबाबत मुलांना समज यावी यासाठी नदीपात्र भेट घेण्याचे ठरले. आम्ही ज्यावेळी संपूर्ण नदीपात्र फिरलो त्यावेळी अनेक ठिकाणी गणेशमूर्तींचे भग्न अवशेष, निर्माल्य, कचरा हे सगळं मुलांनी प्रत्यक्ष पाहिलं आणि 'दादा आपण शक्य तेवढा कचरा गोळा करूयात आणि यापुढे किमान आपल्याकडून तरी आपली नदी प्रदूषित होणार नाही याची काळजी घेऊया.' अशी उत्स्फूर्त प्रतिक्रिया दिली. ही प्रतिक्रिया ऐकून आपण केलेले पथनाट्य मुलांच्या मनात खऱ्या अर्थाने रुजले आहे याचे समाधान वाटले.

**- रौनक खाटेर,**
स्वामी अखंडानंद शाखा



'स्व'-रूपवर्धिनीच्या ढोल ताशाच्या वादनाला कोंदण असते ते त्याच्या मागे-पुढे नाचणाऱ्या शाळकरी मुलांच्या झांज, ध्वज, लेझीम, टिपरी, टाळ यांसारख्या पथकांचे.

वर्धिनींच्या शाखांवर एक-दीड महिना आधिपासूनच पथकांसाठीची लगबग सुरू होते, रोज शाखेच्या वेळेतील काही भाग हा या पथकांच्या सरावासाठी राखून ठेवला जातो व आपलेच पथक कशा प्रकारे उत्तम व आकर्षक होईल यासाठी सर्वजण प्रयत्न करत असतात. जागतिक महामारीमुळे गेली दोन वर्षे हा सर्वांना हवाहवासा वाटणारा उत्सव आपल्याला साजरा करता आला नाही, परंतु यंदा मात्र ती कसर भरून काढण्याची संधी बाप्पाने आम्हाला दिली.

यंदाच्या वर्षी पथकांमध्ये ३ झांज, ३ ध्वज, १ लेझीम, १ टाळ आणि १ टिपरी या पथकांचा समावेश होता. अत्यंत सुंदर प्रात्यक्षिकांचे वर्धक वर्धिकांमार्फत सादरीकरण झाले. एकंदरीत २ वर्षाच्या प्रदीर्घ काळानंतर मुले नव्या जोमाने व उत्साहाने पथकातील सहभागाचा आनंद लुटत होती. टाळ्यांच्या गजरात या सादरकर्त्यांचे कौतुक झाले.

स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त विविध प्रकारांचा पथकांमध्ये समावेश केलेला होता. त्या सादरीकरणाला प्रेक्षकांनी उत्स्फुर्त दाद दिली. 'भारतीय संविधान हाच अंतिम सत्याचा मार्ग' यावर देखील मुलांनी सादरीकरण केले. कॉमनवेल्थ स्पर्धेत पदक मिळवलेल्या खेळाडूंची झलक आपल्याला पथकात पहायला मिळाली. पारंपारिक मनोऱ्यात रामरथ, दहिहंडी, गणेशरथ यांसारख्या प्रकारांनी उपस्थितांच्या डोळ्यांचे पारणे फेडले तसेच ऐतिहासिक देखाव्यात लक्ष्मी रोडवर सादर केलेल्या 'अफजलखान वधाच्या' देखाव्याने तर प्रेक्षकांना दाद द्यावयास भाग पाडले. याची दखल विविध वृत्तवाहिन्यांनी घेतली. ९ ठिकाणी आपण पथकाच्या माध्यमातून श्री गणरायाच्या चरणी सेवा दिली. तसेच अनंत चतुर्दशीला मानाचा चौथा गणपती तुळशीबाग सार्वजनिक गणेशोत्सवाच्या विसर्जन मिरवणुकीत 'स्व'-रूपवर्धिनीच्या वर्धकांनी मल्लखांबाची चित्तथरारक प्रात्यक्षिके सादर केली. नेत्रदीपक असलेली शिवकालीन युद्धकला देखील याच मिरवणुकीत नागरिकांना पहायला मिळाली.

यावर्षी प्रथमच अनपेक्षित वेळेला श्रीमंत दगडूशेठ हलवाई गणपती विसर्जन मिरवणुक सुरू झाली तरी देखील त्याच उत्साहाने आपल्या वर्धक व युवतींनी पथकांचे सादरीकरण केले. पथकांमध्ये वय वर्ष १० पासून अनेकांनी सहभाग घेतला. एकूण ४०० वर्धक - वर्धिका व युवक युवतींनी सहभाग नोंदवला. यावर्षी गणेशोत्सव प्रमुख म्हणून श्री. अमोल शेलार, केंद्रीय पथक प्रमुख म्हणून अक्षय मुळे व सहाय्यक म्हणून हर्षल नरवडे यांनी जबाबदारी पाहिली.

# स्वातंत्र्यदिन कार्यक्रम



यावर्षी श्री. विवेक देशपांडे (राष्ट्रीय स्वयंसेवक संघ पश्चिम महाराष्ट्र, पर्यावरण संरक्षण सहसंयोजक) यांच्या हस्ते ध्वजारोहण झाले. रुग्ण सहाय्यक वर्गातील सर्व विद्यार्थिनींनी राष्ट्रभक्तीपर पद्य सादर केले. देशपांडे सरांनी मार्गदर्शन करताना प्रत्येकजण स्वत: पर्यावरण संरक्षणासाठी कशा पद्धतीने योगदान देऊ शकतो हे स्पष्ट केले. त्यासाठी होणाऱ्या कार्यशाळेत सहभागी व्हायचे आवाहन केले.



अमृतमहोत्सवी स्वातंत्र्यदिन शाखांमध्ये वेगवेगळ्या उपक्रमातून साजरा झाला. ‘हर घर तिरंगा’ हे अभियान चांगल्या रीतीने राबविले. क्रांतिज्योती शाखेतील वर्धिकांनी व स्वामी सुबोधानंद शाखेतील वर्धकांनी गटश: वस्तीत फिरून रस्त्यावर पडलेले झेंडे उचलून स्वच्छता कर्मचाऱ्यांकडे जमा केले. स्वामी विवेकानंद शाखेत देशभक्तीवरील पद्ये मुलांनी सदर केली. अभिजित दोडके दादाने



स्वातंत्र्यपूर्व काळाचा इतिहास गोष्टीरूपात सांगून सध्या आपण मिळवलेले स्वातंत्र्य कसे जपले पाहिजे, त्यासाठी आपली कर्तव्ये कोणती आहेत यावर मुलांशी संवाद साधला. धर्मवीर शंभूराजे शाखेत मुलांनी स्वातंत्र्यासाठी प्राणांचे बलिदान दिलेल्या क्रांतिकारकांना आदरांजली वाहिली. शाखेच्या मैदानात भारतमातेचा जयजयकार करत संचलन झाले. समर्थ रामकृष्ण शाखेत पालक आणि वर्धक यांच्यासाठी चित्रकला स्पर्धा झाली. बक्षीस वितरण मा. पुष्पाताई नडे यांच्या हस्ते झाले. स्वामी दयानंद शाखेत



शाखा स्थानाच्या परिसरात पथसंचलन झाले. अप्पर इंदिरानगर बस स्थानक चौकात शिववंदना, वंदेमातरम व विश्वकर्मा चौकात राष्ट्रभक्तीपर पद्याचे सादरीकरण झाले. कार्यक्रमाची सांगता संविधान वाचनाने झाली. या कार्यक्रमास नागरिकांनी आणि पालकांनी उत्तम प्रतिसाद दिला.





# युवा विभाग



**कार्यकर्ता प्रशिक्षण शिबिर -** शिबीराची सुरुवात ‘कार्यकर्ता कसा असावा’ या विषयावरील लेखांच्या वाचनाने झाली. पहिल्या सत्रात वर्धिनी कामाचे महत्त्व या विषयावर श्री. सुमित डोळे यांनी सर्वांना मार्गदर्शन केलं. एखाद्या वस्तूची किंमत व मूल्य यातील फरक वेगवेगळी उदाहरणे सांगून वर्धिनीचे काम, जबाबदारी आपले मूल्य वाढवायला मदत करते हे त्यांनी पटवून दिले.

- नंतरच्या सत्रात भारतीय संविधान आणि त्याला असलेले संभाव्य धोके यावर चर्चासत्र घेण्यात आले. देशात नुकत्याच घडलेल्या



काही घटना व त्यांच्या मागील कारणे यांची अभ्यासपूर्ण मांडणी करण्यात आली. महेश पवळे, सौरभ वीरकर, भारत अमदापुरे आणि निलेश धायरकर यांनी हे सत्र घेतले.

- संविधान सर्वप्रथम हा विषय मांडताना श्री. प्रदिपदादा रावत यांनी आफ्रिकेतून मानवी वंशाची झालेली सुरुवात, त्याचा जगभर झालेला विस्तार आपल्या व्याख्यानात मांडला.
- ''गप्पा सेवेकऱ्यांशी'' या प्रेरणा सत्रात डॉ. सुजित निलेगावकर यांचा प्रवास मांडण्यात आला.
- शिबिराच्या दुसऱ्या दिवशीचे पहिले प्रबोधन सत्र संस्थेचे कार्यवाह श्री. विश्वास कुलकर्णी सर यांचे झाले. त्यामध्ये सरांनी संघटना हा विषय मांडला. त्यात त्यांनी संघटन या शब्दाची फोड करून संघटना म्हणजे संघ अधिक घटना. संघ म्हणजे एकच विचार. असे एका मताचे काही लोक एकत्र येऊन एका विशिष्ट ध्येयासाठी काम करतात व त्या समूहाची काम करण्यासाठीची जी नियमावली असते ती म्हणजे घटना. अशी संघ आणि त्याची काम करण्याची घटना मिळून संघटना तयार होते. त्यावेळी सरांनी वेगवेगळ्या उदाहरणातून संघटना व त्याची काम करण्याची पद्धत सांगितले.
- श्री. संदीप मोरे व श्री. हरिश्चंद्र मिसाळ यांनी सूर्यनमस्कार, योगासन प्रशिक्षण वर्ग घेतला.
- ''गप्पा सेवेकऱ्यांशी'' या सत्रात अकरावी व बारावीसाठी श्री. तन्मय कानिटकर आणि FY ते पुढील युवकांसाठी





श्री. संजय तांबट सर, विलास कुलकर्णी सर यांची मुलाखत घेण्यात आली.

- शाखा विभागातील व्यवस्थांचे प्रशिक्षण व कृतीसत्र घेण्यात आले. या वेळेत शाखा विभागाच्या प्रत्येक शाखेच्या शाखाप्रमुख, व्यवस्थाप्रमुख व युवाप्रमुख यांची वेगवेगळी चर्चासत्रं, प्रशिक्षण वर्ग व बैठका झाल्या.
- समारोप सत्रास संस्थेचे कार्यवाह विश्वास कुलकर्णी सर, सहकार्याध्यक्ष संजय तांबट सर व युवा विभाग पालक अमोल उंदरे सर उपस्थित होते. कार्यक्रमाच्या वेळेस केंद्रीय नियुक्त्या जाहीर करण्यात आल्या व तसेच शाखा विभाग व युवक विभागाचे उद्दिष्ट सादर करण्यात आले. त्यानंतर अमोल उंदरे सरांनी युवकांना मार्गदर्शन केले.

**अभिनंदनीय वार्ता –** निवेदिता शाखेतील जेष्ठ युवती सौ. संगीता यादव यांची खडक पोलीस स्टेशन वरिष्ठ पोलीस निरीक्षकपदी निवड झाली. वर्धिनीसाठी हा अत्यंत अभिमानाचा क्षण आहे.

# शाखा विभाग



- **रक्षाबंधन –** हा उत्सव सर्व शाखांमध्ये सामाजिक रक्षाबंधन म्हणून साजरा झाला.

क्रांतीज्योती सावित्री शाखेत दि. ६ ऑगस्टला राखी बनवणे हे कृतीसत्र झाले. या बनवलेल्या राख्या मुलींनी परिसरातील भाजी विक्रेते, दूध विक्रेते, मिठाई व किरणामाल दुकानदार व तेथील कामगारांना तसेच तसेच स्वामी श्रद्धानंद शाखेतील वर्धकांना आणि युवकांना बांधल्या. भगिनी निवेदिता शाखेतील मुलींनी परिसरातील दारूवाला पोलीस स्टेशन, नरपतगीरी, समर्थ पोलीस स्टेशन येथील पोलीस व कर्मचारी वर्गाला राख्या बांधून त्यांच्या सेवेप्रती कृतज्ञता व्यक्त केली. स्वामी ब्रम्हानंद शाखेतील वर्धकांनी सिंहगड रोड पोलीस स्टेशन, अग्निशामक केंद्र, वडगाव बुद्रुक महानगरपालिका दवाखाना येथील







कर्मचाऱ्यांना राखी बांधून शाखा कामाची ओळख करून दिली. स्वामी विवेकानंद शाखेच्या कार्यक्रमात पालक व वर्धकांच्या बहिणी सहभागी झाल्या. स्वामी अखंडानंद शाखेने परिसरातील शिवतेजनगर






अभ्यासिकेतील पालकांचे, विद्यार्थ्यांचे व वर्धकांचे एकत्रीकरण घेऊन उत्सव साजरा केला. स्वामी सुबोधानंद शाखेतील वर्धकांनी आरोग्य कोठीतील स्वच्छता कर्मचाऱ्यांना कृतज्ञतापुर्वक राख्या बांधल्या.

◆ **समर्थ रामकृष्ण शाखेत** १३ ऑगस्टला 'शोध रे उत्तर शोध' अशी विशेष स्पर्धा घेण्यात आली. खजिना शोधप्रमाणे मुलांचे गट पडून प्रत्येक गटासाठी ८ टास्क दिले होते. प्रत्येक टास्कच्या चिठ्ठ्या बनवून त्या वर्धिनीच्या संपूर्ण इमारतीत वेगवेगळ्या जागेवर लपवून ठेवल्या होत्या. काय होते बरं ह्या चिठ्ठयांमध्ये ? ह्या चिठ्ठयांवर बेरीज, गुणाकार, भागाकार व वजाबाकी यावरील उदाहरणे, काहींवर वर्ग, घन, तर काहींवर पाढे. शिक्षण आनंददायी करण्याचा हा प्रयत्न खरंच मुलांना आवडला. दि. १७ ऑगस्टला टाटा मोटर्स पिंपरी-चिंचवड, पुणे या ठिकाणी शाखेतील मुलांनी मल्लखांब प्रात्यक्षिके सदर केली. मल्लखांब झाल्यावर प्रेक्षकांनी उभ्या राहून टाळ्या वाजवल्या. सर्वांनी उपस्थितांची मने जिंकली.

◆ **नरवीर शाखेत** २० ऑगस्टला तासिका प्रशिक्षण वर्गात झालेला 'मेक स्पेलिंग' हा उपक्रम शाखेत घेण्यात आला.



## सर ! आता पुढच्या रविवारी कुठे ?

वर्धिनीचे ज्येष्ठ कार्यकर्ते स्वामी देवसेवानंद यांनी नाशिकच्या पंचवटी भागातील फुलेनगर सेवावस्तीत महानगरपालिकेच्या शाळा क्रमांक ५६ मध्ये वर्धिनीची प्रयत्न शाखा सुरु केली आहे. शाखेच्या शुभारंभ कार्यक्रमात दि. २६ जूनला सेवा सहयोग, पुणे यांच्या सहकार्याने १५ विद्यार्थ्यांना शालेय साहित्य व दप्तरे देण्यात आली. या कार्यक्रमास मुलांचे पालक व राष्ट्रीय स्वयंसेवक संघाचे कार्यकर्ते उपस्थित होते. सततच्या संपर्कातून मुले शाखेत येत आहेत. शाखेची गोडी वाढावी म्हणून वेगवेगळे उपक्रम शाखेत होतात. त्याचबरोबर पुण्यातून वर्धिनीचे कार्यकर्ते भेट देतात. दि. ३ जुलैला शंभूराजे शाखेचे श्री. संदीप जोगळेकर, आदित्य सुळे, सावता माळी साळुंखे व योगेश शिंदे यांनी शाखेत येऊन मुलांचे मैदानी खेळ, पद्य घेतली. दि. २ ऑगस्टला श्री. विलास कुलकर्णी व श्री. बाळासाहेब झांजे यांनी शाखेला भेट दिली. दि. २४ जुलैला मुलांची छोटी सहल झाली. गोदावरी नदीचे व रविवार कारंजा चौकातील चांदीच्या गणपतीचे दर्शन घेऊन सोमेश्वर मंदिर व संघ कार्यालय मुलांनी बघितले. दि ३१ जुलैला मुलांनी सीता गुंफा, काळाराम मंदिर बघून त्यांचा इतिहास माहीत करून घेतला.



दि. ११ ऑगस्टला पंचवटी पोलीस ठाण्यातील पोलिसांना मुलांनी राख्या बांधून स्वतःची ओळख करून दिली. वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री. सीताराम कोल्हे यांना राखी बांधल्यावर ते म्हणाले, 'मी पण तुमच्यासारखा वर्धिनीच्या



पुण्यातील शाखेत जात होतो. वर्धिनीच्या समोरील वस्तीत मी मोठा झालो. तुम्ही पण रोज शाखेत जा, भरपूर शिकून मोठे व्हा.'

◆ **गणेशोत्सव** – पंचवटी परिसरातील निम्पानी बस स्थानक, मालेगाव बसस्थानक, मधुबन कॉलनी, येथील देखावे बघून जवळ भरलेल्या आनंद मेळ्यात मुलांनी सहभाग घेतला. परतीच्या वाटेवर गंगेच्या पाण्यात पोहून मुले खुश झाली आणि वस्तीत आल्यावर विचारत होती, 'सर, आता पुढच्या रविवारी कुठे ?'

## समुपदेशन विभाग



२९ ऑगस्टला हुजूरपागा या शाळेत आठवीच्या वर्गावर ''कळी उमलताना'' या विषयावर सौ. मेघा नगरे यांनी सत्र घेतले. किशोरवयात मुलींना अनेक प्रश्न पडलेले असतात. मुलींशी संवाद साधताना ताईंनी त्यांच्या वयाची ओळख करून दिली. आपण प्रत्येक गोष्टीकडे सकारात्मक दृष्टीने पाहिले पाहिजे, आपल्या विचारात ताकद असली पाहिजे, एकमेकांना सांभाळून घेणे, मदत करणे, मोठ्यांचा आदर करणे हे तुम्हाला आलेच पाहिजे असे सांगत सत्राच्या शेवटी मुलींच्या मनातील प्रश्नांना ताईंनी मनमोकळेपणाने उत्तरे दिली.

माले नर्सिंग वर्गात ''माझ्यातली मी'' या विषयावर सौ. मेघाताई नगरे यांनी मी म्हणजे नक्की कोण आहे ? स्वतःला समजून घ्या. स्वतःला खूप जास्त आनंद कशामुळे होतो, ह्या गोष्टीचा शोध घ्या. आपण जसे आहोत तसे स्वतःला स्वीकारा, स्वतःला कधी कमी लेखू नका, स्वतःवर प्रेम करायला शिका अशा अनेक मुद्द्यांवर संवाद साधला.

विभागांतर्गत २७ ऑगस्टला 'स्वतःचे नियोजन' या विषयावर रोहित धायरकर यांनी योगानंद शाखेत वर्धकांशी गप्पा मारताना फक्त नियोजन करून उपयोग नाही; जे आपण ठरवले तसे आपण करतो का या निर्णयावर आपण ठाम असले पाहिजे असे सांगितले. रोजच्या दिनचर्येमध्ये व्यायामासाठी वेळ दिलाच पाहिजे. सुट्ट्यांच्या दिवसामध्ये आपल्याला नवीन काही शिकता येईल का ? याचा विचार केला पाहिजे असेही सांगितले.



## उत्थान विभाग

◆ रक्षाबंधन – महात्मा फुले भागात राखी तयार करणे ही स्पर्धा घेण्यात आली. लष्कर भवानी भागात जे लोक आपल्याला सेवा पुरवतात अशा लोकांना घरी बोलवून भोजन, गप्पांच्या माध्यमातून रक्षाबंधन साजरे केले. इतर अभ्यासिकेत राख्या तयार करून एकमेकांना बांधण्यात आल्या.

◆ ७ ऑगस्ट आंतरराष्ट्रीय मैत्री दिनानिमित्त महात्मा फुले भागातील सर्व अभ्यासिका मिळून मुलांचे पर्वती टेकडीवर एकत्रीकरण केले. तिथे मुलांचे दोन गट तयार केले व आपल्या मैत्रीची आठवण म्हणून तिथे



वृक्षारोपण केले.

◆ स्वातंत्र्यदिनाला महात्मा फुले भागात मीठगंज पोलीस चौकीतील अभिजित पवार सरांना बोलवण्यात आले. मुलांनी पद्य, राष्ट्रगीत घेतले आणि नंतर सरांनी मुलांना अभ्यासासंदर्भात मार्गदर्शन केले. कोरेगाव पार्क भागात गायनाचा कार्यक्रम आयोजित



करण्यात आला होता. त्यामध्ये अभ्यासिकेतील मुलांनी सहभाग घेतला



होता व तसेच RSB फौंडेशन माध्यमातून (हर घर तिरंगा) ध्वज वाटपाचा कार्यक्रम घेण्यात आला. या कार्यक्रमाला RSB चे पाटील सर व चेतन कुसाळकर दादा उपस्थित होते. कसब्यात चित्रकला स्पर्धा घेण्यात आली.

- युवती एकत्रीकरण – वेताळबाबा टेकडी येथे करण्यात आले. एकूण १० युवती उपस्थित होत्या. उमेश दादाने आपण ज्या अभ्यासिकामध्ये शिकलो त्याच अभ्यासिकेचे आधारस्तंभ आपण व्हायला पाहिजे, त्या अभ्यासिका आपण चांगल्या पद्धतीने चालवल्या पाहिजे ह्याबाबत चर्चा घडवून आणली.
- १९ ऑगस्टला दहीहंडी निमित्त पुस्तक हंडी करण्यात आली.

---

### अभिनंदन

- रमणबाग प्रशालेत ऋषिपंचमीनिमित्त समाजातील ऋषितुल्य व्यक्तींचा सत्कार करण्यात आला. वर्धिनीचे उपाध्यक्ष श्री. शिरीष पटवर्धन यांचा सामाजिक कामाच्या योगदानासाठी सत्कार करण्यात आला. सरांचे काम सर्वांनाच प्रेरणादायी आहे.
- 'सोशल संडे' या यु-ट्यूब वाहिनीसाठी वर्धिनीच्या सहकार्याध्यक्ष मा. पुष्पाताई नडे यांची संस्थेची माहिती देणारी अनुभवसंपन्न मुलाखत श्री. किशोर कुलकर्णी यांनी घेतली.
- स्पर्धा परीक्षा केंद्रातील विद्यार्थी ऋषिकेश बोराडे याची केंद्रीय लोकसेवा आयोग परीक्षेतून Assistant Commandant पदी निवड झाली.
- स्पर्धा परीक्षा केंद्राचे समन्वयक श्री. विनोद मोरे यांची सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या विद्यार्थी विकास मंडळ समन्वयकपदी निवड झाल्याबद्दल अभिनंदन.

---

## महिला विभाग

**रुग्ण सहाय्यक वर्ग – पुणे –** दि. २८ ऑगस्टला २०२१-२२ या वर्षातील वर्गाचा प्रशस्तीपत्रक वाटपाचा कार्यक्रम झाला. प्रमुख पाहुणे म्हणून पर्ल् हॉस्पिटलचे





संचालक डॉ. गणपुले तसेच वर्धिनीचे उपाध्यक्ष श्री. शिरीष पटवर्धन व कार्यवाह श्री. विश्वास कुलकर्णी, सहकार्यवाह श्रीमती पुष्पा नडे उपस्थित होत्या. २०२१-२२ ह्या वर्षी रुग्ण सहाय्यक विभागाचा निकाल १००% लागला. बक्षिसप्राप्त मुलींचा सत्कार करण्यात आला.

१. शरीरशास्त्र विषयात प्रथम – किशोरी गावडे
२. आदर्श विद्यार्थिनी – प्रतीक्षा माने
३. उत्तेजनार्थ बक्षीस – ओमकेश्वरी कसबे
४. पुणे वर्गात प्रथम – प्रियंका तांबे

मुलींनी आपल्या मनोगतामध्ये संगितले –

- **ओमकेश्वरी कसबे –** वर्धिनी मधील शिक्षणामुळे आम्हाला जबाबदारीची जाणीव झाली. सहनशीलता वाढली.
- **सीमा गायकवाड –** बाहेरच्या जगाची ओळख झाली. आत्मविश्वास वाढला.
- **प्रतीक्षा माने –** घरातील आर्थिक अडचणीमुळे १० वी नंतर वर्ग केला. आज बुदरानीसारख्या मोठ्या हॉस्पिटलमध्ये चांगल्या पगाराची नोकरी करत आहे.

डॉ. गणपुले यांनी मार्गदर्शन करताना विद्यार्थ्यांना शिक्षणाचे महत्त्व सांगितले. टेक्निकल गोष्टी सगळेजण शिकतात पण नर्स म्हणून काम न करता समोरच्यालाही मन आहे त्याचा विचार केला पाहिजे. रुग्णाशी एकरूप व्हायला पाहिजे. ती व्यक्ती कोणत्या परिस्थितीतून जात आहे ते त्रयस्थपणे समजून घेऊन काम केल्याने ५०% रुग्ण आपल्या संवादातूनच बरे होतात. वर्धिनीमधून मिळालेला वसा हा दुसऱ्यांनाही दिला पाहिजे. श्रीमती पुष्पा नडे ह्यांनी सरांचे आभार मानले व कार्यक्रमाची सांगता झाली.



◆ वर्गात नेत्रविकार तज्ज्ञ डॉ. सचिन साळवी यांचे मार्गदर्शन सत्र झाले. विदेशातील आणि आपल्या देशातील नर्सच्या कामाचा तुलनात्मक अनुभव सांगून त्यांनी नर्सच्या जबाबदारपूर्ण कामाचे महत्त्व पटवून सांगितले.

◆ **रुग्ण सहाय्यक वर्ग - माले -** दि. ५ ऑगस्टला 'जागतिक स्तनपान' सप्ताहानिमित्त लोकमान्य हॉस्पिटलमधील डॉ. अर्चना यांनी मासिक पाळी व स्त्री आरोग्य, स्तनपान याबद्दल मार्गदर्शन केले.

◆ सरकारी दवाखाना, ITI प्रशिक्षण केंद्र, परिसरातील किराणा दुकाने येथे जाऊन



रक्षाबंधन साजरे केले. तसेच शेतात भातलावणी करणाऱ्या शेतमजुरांना राखी बांधल्यावर त्यांना विशेष कौतुक वाटले. अशा प्रकारचे सामाजिक रक्षाबंधन मुलीना संवाद कौशल्याचे शिक्षण देऊन गेले.

◆ माले ग्रामपंचायतीतील झेंडा वंदनाच्या कार्यक्रमात मुली सहभागी झाल्या. त्यांनी पद्य सादर केले.







◆ स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानिमित्त राष्ट्रीय सर्वांगीण ग्रामविकास संस्थेच्या मुळशी तालुकास्तरीय निबंध स्पर्धेत खुल्या गटात वर्गाच्या **कु. वेदिका विलास आंबेकर** हिला प्रथम क्रमांकाचे पारितोषिक मिळाले.

## पाकोळी बालवाडी



श्रावणातील महिन्याची सुरुवात झाली आणि बालवाडीत अनेक सण उत्साहात साजरे झाले.

◆ दि. १ ऑगस्टला नागपंचमीला मुला मुलींनी हातावर मेहंदी काढून छान तयार होऊन आली. मुलांनी वारुळाची पूजा करून फेर धरून गाणी म्हटली. छोट्या मुली छान फुगडी खेळत होत्या.

◆ दि. १० ऑगस्टला नारळी पौर्णिमा साजरी



केली. 'नवी नवी छान मी साडी नेसणार' या गाण्यावर मुलींनी छान नाच केला. मुलांचे औक्षण करून एकमेकांना राखी बांधण्यात आली. सर्वांना नारळ भात खाऊ देण्यात आला.



◆ दि. १५ ऑगस्ट झेंडावंदनाला मोठ्या गटातील मुले वेगवेगळ्या स्वातंत्र्यवीरांच्या वेशभूषा करुन सहभागी झाली.

◆ दि. १८ ऑगस्ट सर्व वर्गातील मुलांनी एकत्रितपणे दहीहंडी फोडली. प्रसाद म्हणून मुलांना दडपे पोहे देण्यात आले. श्रावणी शुक्रवार प्रत्येक वर्गात साजरा करण्यात आला. देवी पुढे सुशोभन करून पूजा आरती करण्यात आली व मुलांना प्रसाद म्हणून फुटाणे देण्यात आले. शेवटच्या शुक्रवारी मा. पुष्पाताईंनी मुलींचे पूजन केले व त्यांना भेटवस्तू दिल्या. तसेच सर्व मुलांनी जेवणाचा आनंद घेतला.



# संपर्क व निधी संकलन विभाग

दि. १५ सप्टेंबरला डॉ. वर्षा पोतदार (MSc. Ph.d.) यांनी लसीकरण, संशोधन आणि आरोग्य या विषयावर वर्धिनीच्या कार्यकर्त्यांशी संवाद साधला. शारदा शक्ती सन्मान, इंडिया टुडे कडून विशेष सन्मान आणि महाराष्ट्र कोविड योद्धा सन्मान अशा अनेक पुरस्कारांनी त्यांना गौरवण्यात आले आहे. नॅशनल इन्स्टिटयूट ऑफ व्हायरॉलॉजी येथे संशोधक म्हणून एका विभागाच्या प्रमुख म्हणून त्या कार्यरत आहेत. नर्सिंग विषयी बोलताना त्यांनी या क्षेत्रातील संशोधनाच्या संधी या विषयी मार्गदर्शन केले. कोविड काळात पीपीई किट तयार करून त्याचे वितरण, अनेक कोविड केंद्रांना मार्गदर्शन, कोविड तपासणी, नवीन लॅब सुरू करण्यातील मार्गदर्शन या कामात आलेले अनुभव ताईंनी मांडले. सामाजिक कामाची तळमळ आणि आस्था त्यांच्या कृती आणि विचारातून दिसली. पुढील काळातही वर्धिनीच्या कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करण्याचे त्यांनी मान्य केले.

---

**संकटं कोसळली, धीराने संघर्ष केला... आता ''प्रतीक्षा'' सुखाच्या क्षणांची -**

ती वर्धिनीतील तिच्या एका मैत्रिणीशी बोलत होती. ''अगं तुला खरंच सांगते, माझ्या आयुष्यात परीक्षा पाहणारे इतके प्रसंग आले आणि त्यांच्याशी झुंज देताना मी आधारासाठी ''माझी माणसं'' शोधत होते. अशी माणसं की ज्यांच्यावर विश्वास ठेवावा, प्रसंगी ज्यांच्या पायावर डोके ठेवावं. रुग्ण सहाय्यक कोर्सच्या निमित्ताने मला 'अशी माणसं' वर्धिनीत भेटली. मी खरंच भाग्यवान आहे.''

प्रतीक्षाचं हे बोलणं माझ्या कानावर पडलं आणि माझ्या डोळ्यासमोर तिच्या जगण्याचा संघर्ष उभा राहिला. प्रत्येकाच्या जीवनात संघर्ष अटळ असतो. तरीही खडतर परिस्थितीवर मात करून यशाचे शिखर गाठता येते याचं उदाहरण म्हणजे प्रतीक्षा माने. कोरोना काळात पतीचे निधन झाले. वय जेमतेम २४ वर्षे. सासरच्यांनी आधार देण्याऐवजी तिला घरातून बाहेर काढलं. तिच्या पदरात पाच आणि सहा वर्षांची अशी दोन लेकरं. दोन्हीही मुली. माहेरी आईकडे आली खरी पण सख्ख्या भावाने सांभाळण्यास नकार दिला. सुदैवाने आई-वडिलांमुळे तिला माहेरी आसरा मिळाला. १० वी पास इतकंच शिक्षण झाल्याने तिला कोठेच नोकरी मिळेना. खर्च वाढल्यामुळे भाऊ देखील त्रास देऊ लागला. म्हणून तिने के.ई.एम. हॉस्पिटलमध्ये मावशीची नोकरी स्वीकारली. तिथेच तिला वर्धिनीतील वर्गाबद्दल समजले. के.ई.एम. हॉस्पिटलमध्ये नोकरी करत असलेल्या वर्धिनीच्या आधीच्या तुकडीतील विद्यार्थिनींनी तिला हवी ती आर्थिक मदत करण्याची तयारी दाखवली. आई-वडिलांच्या साथीने वर्धिनीमध्ये २०२१-२२ च्या रुग्ण सहाय्यक वर्गाला तिने प्रवेश घेतला. परिस्थितीशी झुंज देत प्रतीक्षाने यावर्षी २०२२ वर्गाची परीक्षा दिली. निकाल लागण्याअगोदरच तिला बुधरानी हॉस्पिटलमध्ये चांगल्या पगाराची नोकरी मिळाली. चांगला पगार मिळतोय हे पाहिल्यावर भावाचे वागणेदेखील बदलले. घरात, शेजारी-पाजारी तिला मान मिळू लागला.

आहे ती परिस्थिती स्वीकारून, नशिबाला दोष न देता, झुंज द्यायची ठरवलं तर संकटंसुद्धा माघार घेतात. काटेकोर नियोजन करून सातत्यपूर्ण प्रयत्न केले तर यश नक्की मिळते. आज तिच्या चेहऱ्यावरचा आत्मविश्वास बघताना आपण वर्धिनीत काम करतोय याचा नकळत अभिमान वाटला.

**- सुनीता गंगावणे**

---

# श्रद्धांजली

- वर्धिनीच्या कार्यकर्त्या श्रीमती बागेश्री पोंक्षे यांच्या आई **सौ. मंदा मोहन गोखले** (वय ८३) यांचे दुःखद निधन झाले.

**परमेश्वर त्यांच्या आत्म्यास शांती देवो.**
**वर्धिनीचा परिवार या सर्वांच्या कुटुंबियांच्या दुःखात सहभागी आहे.**